Estd : 1962
" A++" Accrediated by
NAAC (2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
**DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in**
**Website Conduit:(1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/परिपत्रक/ दि.

## परिपत्रक

**प्रति,**
**मा.प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था.**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**विषय -** "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर झंडा" उपक्रम राबविण्याबाबत..
**संदर्भ -** १. शासन परिपत्रक संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११० (भाग-२)/सां.का.४ दि.२० जून, २०२२
२. राजभवन RB/Gen-२०२२/CR-१०६/EdN-४/७१७ दि. ०१ जुलै, २०२२

**महोदय/ महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून आदेशान्वये कळविण्यात येते की, "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत दि.११ ऑगस्ट, २०२२ ते दि. १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

तरी सोबत जोडलेले पत्र अवलोकनी घेवून विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही आपल्या ~~स्तरावरून~~ स्तरावर त्वरीत करावी,

कळावे,

आदेशान्वये

7/7/2022
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत - वरिल प्रमाणे

D:\ssv\Circular.docx

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

VC Office <vcoffice@unishivaji.ac.in>

# "Har Ghar Zhanda" initiative under the Diamond Jubilee Celebration of freedom "Azadi Ka Amrit Mahotsav".

**RAJUSHIVRAMKADAM ASSISTANT** <raju.kadam@nic.in> Mon, Jul 4, 2022 at 11:38 AM
To: vc <vc@bamu.ac.in>, vc <vc@dbatu.ac.in>, Vc Office DBSKKV Dapoli <vcdbskkv-mh@gov.in>, vc <vc@gondwana.digitaluniversity.ac>, kksuvc <kksuvc@gmail.com>, vcmafsu <vcmafsu@gmail.com>, vc <vc@muhs.ac.in>, vcmpkv <vcmpkv@rediffmail.com>, vcmpkv <vcmpkv@gmail.com>, vice-chancellor <vice-chancellor@mu.ac.in>, vco <vco@nmu.ac.in>, vc <vc@pdkv.ac.in>, vco <vco@sus.ac.in>, Dr Subhash R Chaudhari <vc@nagpuruniversity.nic.in>, vc <vc@sndt.ac.in>, vc <vc@sgbau.ac.in>, puvc <puvc@unipune.ac.in>, vcoffice <vcoffice@unishivaji.ac.in>, vcoffice <vcoffice@srtmun.ac.in>, vcvnmkv <vcvnmkv@gmail.com>, vc ycmou <vc.ycmou@gmail.com>, vchbsu <vchbsu@iscm.ac.in>, secretary hsncb <secretary.hsncb@gmail.com>

Shivaji University, Kolhapur
Inward No 4635
6/7/22

Dear Sir / Madam

Pls find enclosed herewith a letter regarding "Har Ghar Zhanda" initiative under the Diamond Jubilee Celebration of freedom "Azadi Ka Amrit Mahotsav". .

regards

R S Kadam
Under Secretary to the Governor

SHIVAJI UNIVERSITY
Vice-Chancellor's Office
Date - 4 JUL 2022
Inward No. 119
To Whom PVC

Azadi Ka Amrit Mahotsav

Shivaji University, Kolhapur
Pro-Vice-Chancellor Office
Date :- 5/7/2022
Inward No :- 242
To Whom · PVC/Affi-T-2

All VCs Har ghar zhanda.pdf
3471K

(1) PVC
(2) R/Est./Est.P.G./DSD/NSS/Affi-T2.
(3) DBEE
(4) FAO

4/7/2022

— Est-PG- & Aff-T2 to circulate to all HoD & Colleges resp.
682/415
— NSS to take initiative.

SSN 06/7/22

4/7/2022

6/7

5/7

**Santosh Kumar,** I.A.S.
Principal Secretary to the
Governor of Maharashtra

**RAJ BHAVAN**
Malabar Hill
Mumbai 400 035
Tel. : 022-2363 7671
Fax. : 022-2363 3272
Email : secy.rb-mh@nic.in

01 **July 2022**

**Dear**

I enclose herewith a copy of the GR dated 20th June, 2022 issued by the Tourism and Cultural Affairs Department, Govt. of Maharashtra, relating to the "Har Ghar Zhanda" initiative under the Diamond Jubilee Celebration of freedom "Azadi Ka Amrit Mahotsav".

In this context, I request you to kindly take appropriate action for displaying the national flag on the University and affiliated college buildings and also give necessary instructions to the faculties/ staff and students to do the same on their buildings during 11th August to 17th August, 2022.

**With best wishes,**

Yours sincerely,

**(Santosh Kumar)**

To,

All VCs of the Universities in the State

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत
"हर घर झंडा" उपक्रम राबविण्याबाबत

NIC Receipt
24.06.2022
No. 5284347

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० जून, २०२२

वाचा :- १) केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाचे सादरीकरण
दिनांक १२ एप्रिल, २०२२ व दिनांक २० मे, २०२२
२) भारतीय ध्वज संहिता २००५

---

**प्रस्तावना :-**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनात या स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक/ क्रांतिकारक/ स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरुपी जनमानसात रहावी, या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

२. केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाने "हर घर झंडा" या विषयावरील दि.१२.०४.२०२२ व दि. २०.०५.२०२२ च्या दोन स्वतंत्र सादरीकरणांद्वारे या कार्यक्रमाच्या आयोजनाच्या अनुषंगाने विविध निर्देश दिलेले आहेत. त्यामध्ये, (१) या उपक्रमांतर्गत सर्व शासकीय/ निमशासकीय/ खाजगी आस्थापना /सहकारी संस्था/ शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या इमारतींवर व नागरिकांनी स्वतःच्या घरावर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फूर्तीने करण्यासाठी सकारात्मक प्रभावी प्रसिद्धी मोहिम राबविण्यात यावी. (२) याबाबत सुक्ष्म नियोजनबद्ध कार्यक्रम आखण्यात येऊन उपरोक्त कालावधीत सदर उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात यावा. (३) या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व शासकीय/ निमशासकीय यंत्रणांनी प्रसार माध्यमातून जाणीव-जागृतीची मोहिम प्रभावीपणे राबवावी. (४) स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्रे, स्वस्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्व सामान्य नागरिकांशी निगडीत यंत्रणांचा वापर करुन सदर कार्यक्रम यशस्वी करावा, अशा सूचनांचा समावेश आहे. केंद्र शासनाच्या "हर घर झंडा" उपक्रम राबविण्याबाबतच्या दि. १२.०४.२०२२ च्या सादरीकरणांची प्रत सर्व मंत्रालयीन विभाग तसेच जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आली आहे. तसेच,

दि.२०.०५.२०२२ च्या सादरीकरणाची प्रत सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आयुक्त, महानगरपालिका यांना यापूर्वीच पाठविण्यात आली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या सदरच्या मार्गदर्शक सूचना सर्व विभागांच्या पुनश्च: निदर्शनास आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या गौरवशाली पर्वानिमित्त दिनांक १२ मार्च, २०२१ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत "आजादी का अमृत महोत्सव" या उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाने कळविले आहे. त्यानुसार राज्यात सदर कालावधीमध्ये "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" साजरा करण्याबाबत शासन निर्णय/शासन पत्रांद्वारे यापूर्वीच वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाने जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायम स्वरुपी मनात राहावी व त्याचे संस्मरण व्हावे या उद्देशाने "आजादी का अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये देशभरात "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना एकत्रितरित्या खालीलप्रमाणे पुन्हा उद्धृत करण्यात येत आहेत :-

१) सर्व शासकीय / निमशासकीय यंत्रणांनी प्रसार माध्यमातून देशाभिमान व जाणीव-जागृतीची मोहिम प्रभावीपणे राबवावी.
२) दिनांक ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत प्रत्येक शासकीय/निमशासकीय व खाजगी आस्थापनांवर तसेच, प्रत्येक घर व इमारतींवर राष्ट्रध्वज उभारणेसाठी नागरीकांना प्रोत्साहीत करावे.
३) नागरिकांनी राष्ट्रध्वज स्वत: विकत घेऊन उभारण्यासाठी त्यांना प्रेरीत करावे.
४) सदर राष्ट्रध्वज उभारणीसाठी जास्तीत जास्त प्रसिद्धी करावी. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करण्यात यावा.
५) केंद्रिय गृह विभाग यांच्या दिनांक ३० डिसेंबर २०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये भारतीय ध्वज संहिता २००२ भाग-१ मधील परिच्छेद १.२ मधील राष्ट्रध्वज हे "हाताने कातलेल्या किंवा विणलेल्या लोकर/सुत/सिल्क/खादी कापडापासून बनविलेला असेल", या तरतूदीमध्ये बदल करण्यात आला असून सदर बदलानुसार राष्ट्रध्वज हे हाताने कातलेल्या आणि हाताने विणलेल्या किंवा मशीनद्वारे तयार केलेल्या सुत / पॉलिस्टर/ लोकर/ सिल्क/खादी पासून बनविलेल्या कापडाचे असावेत असा उल्लेख केला आहे. या बदललेल्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेल्या राष्ट्रध्वजाचा वापर या प्रयोजनासाठी करता येईल.
६) संगीतातूनही राष्ट्रध्वजाबाबत वेगवेगळ्या पद्धतीने सादरीकरण करता येईल.
७) "हर घर झंडा" या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी करावी.

८) या उपक्रमामध्ये राज्य / देशातील / परदेशातील सहभागी होणाऱ्या व्यक्तींची नोंद घ्यावी.

९) राष्ट्रध्वज मुबलक उपलब्ध होणेबाबत खात्री संबंधित यंत्रणांनी करावी.

१०) ऑनलाईन व ऑफलाईन राष्ट्रध्वज विक्री केंद्र राज्याने उपलब्ध करुन द्यावे

११) भारतीय ध्वज संहितेचे पालन व्हावे व जाणते-अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अपमान होऊ नये, याची दक्षता घेण्याबाबत नागरिकांमध्ये जाणीव-जागृती करावी.

१२) "हर घर झंडा" या उपक्रमांतर्गत कार्यक्रमाची छायाचित्रे, चित्रफिती, ध्वनीमुद्रण इ. केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाच्या amritmahotsav.nic.in या संकेत स्थळावर अपलोड करावे.

१३) नागरिकांमध्ये या उपक्रमाबाबत रुची निर्माण करण्यासाठी वेबसाईट, ई-कॉमर्स तसेच राष्ट्रध्वज भेट देणे अशा माध्यमांचा आधार घेण्यात यावा.

१४) स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्रे, स्वस्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्व सामान्य नागरीकांशी निगडीत यंत्रणांचा वापर करुन सदर कार्यक्रम यशस्वी करण्यात यावा. याबाबतचा मार्गदर्शक कृती आराखडा सोबत परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविण्यात आला आहे.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२२०६२०१८१९२१८२२३ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सोबत - परिशिष्ट - अ

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) / मा. राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व पोलीस आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक

१०.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११.सर्व आयुक्त, महानगर पालिका
१२.सर्व मुख्य अधिकारी, नगर पालिका / नगर पंचायत
१३.सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी
१४.पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखाली सर्व क्षेत्रिय अधिकारी
१५.संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१६.निवड नस्ती, सां.का.४

## परिशिष्ट – अ

(अ) कृती आराखडा : ग्राम पंचायती

- सर्व ग्राम पंचायती - ग्रामीण प्रसारासाठी महत्वपूर्ण माध्यम
- संबंधित विभागांच्या स्तरावर आवश्यक असलेल्या ग्राम पंचायतींच्या प्रमुखांबरोबर संपर्क सत्रे / चर्चासत्रे यांचे आयोजन करावे.
- प्रत्येक गावात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करावी.
- बचत गटांचा सहभाग स्थानिक : शिलाई काम करणाऱ्या गटांद्वारे ध्वजांची शिलाई / निर्मिती करता येईल.
- विक्री / वितरण केंद्र म्हणून ग्रामपंचायत कार्यालयांचा उपयोग करुन घ्यावा.
- ग्राम पंचायतींद्वारे ध्वजांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करता येईल. सदर खरेदी स्थानिक घरांच्या संख्येवर आधारीत असावी.
- सर्व शासकीय इमारती / संस्थांवर ध्वजारोहण करावे.
- स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे.

(आ) कृती आराखडा : आरोग्य केंद्रे, रुग्णालय + ANM

- आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामुदायिक आरोग्य केंद्रे, उपविभागीय रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा या उपक्रमात महत्वपूर्ण सहभाग अपेक्षित आहे.
- संदेश वहन साहित्य – प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इ. स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत.
- प्रसुतिगृहातील सहाय्यक परिचारिकांना तिरंग्याची माहिती असलेल्या पुस्तिका (फ्लिप बुक्स) यांचे वाटप करावे.
- लहान मुलांना रंग देण्यासाठी छापील आकृत्या, छापील कागद (कटआउट्स, प्रिंटआउट्स) उपलब्ध करुन द्यावेत.
- रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षामध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे, आजादी का अमृत महोत्सव इ. बाबतचे चित्रपट दाखवावेत.

(इ) कृती आराखडा : रास्त भाव धान्य दुकाने (वाजवी किंमतीची दुकाने)

- रास्त भाव दुकाने :- ध्वज वितरण विक्री केंद्र म्हणून काम पाहावे.
- या दुकानांमध्ये आणि त्याच्या सभोवताली पूर्व ध्वनीमुद्रित संदेश, सांगितिक जाहिराती (जिंगल), राष्ट्रध्वजावरील माहिती माईकवर प्रसारित करावी.

(ई) कृती आराखडा: शाळा आणि महाविद्यालये

- शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्यामार्फत जाणीव-जागृती करणे. सदर योजनेचा प्रचार, प्रसार करण्यासाठी या माध्यमाचा वापर करावा.
- राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने / शिबीरे / चर्चासत्र इ. चे आयोजन करावे.
- #hargharjhanda या हॅशटॅगखाली समाज माध्यमांवर छायाचित्रे प्रसारित करावीत. राज्य/जिल्हा/शाळेचा उल्लेख करुन सोशल मीडियावर फोटो शेअर करावेत.
- पालकांचा सहभाग :- सर्व पालकांना सहभागी होण्यासाठी विशेष दैनंदिन सूचना पत्रे, पत्रके वितरीत करावीत.
- पालक शिक्षक सभा :- हर घर झंडा विषयी माहिती देण्यासाठी पालक शिक्षक सभांचे आयोजन करावे.

(उ) कृती आराखडा : पोलीस

- पोलीस महासंचालकांद्वारे हर घर झंडा या कार्यक्रमाबाबत विशेष बैठकांचे आयोजन करावे.
- विशेष तिरंगा मानवंदना संचलने आयोजित करावीत.
- हर घर झंडा या कार्यक्रमाविषयी प्रचार, प्रसार व जागरुकतेसाठी प्रचार साहित्य, पत्रिका व इतर साहित्य वितरीत करावे.
- पथनाट्यांद्वारे तिरंग्याची आण-बाण-शान या संकल्पनेचा प्रसार करण्यात यावा.
- पोलिस स्टेशन परिसरात - फलक, प्रसिध्दीपत्रके, उभे फलक (स्टॅंडी) लावणे व ध्वजारोहण करणे.
- पोलिस वसाहतींमध्ये राष्ट्रध्वजाची विक्री व वितरण केंद्रे निर्माण करण्याची विशेष मोहीम घ्यावी.
- सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वसाहतींमध्ये / घरी ध्वजारोहण करावे.
- प्रत्येक पोलीस तपासणी नाक्यावर तिरंगा ध्वजाची प्रसिध्दीपत्रके लावावी.

(ऊ) कृती आराखडा : परिवहन सुविधा

- राज्य परिवहनच्या बसेस "हर घर झंडा" याच्या संदेशाने रंगविल्या जाव्यात.
- पथकर व तपासणी नाके यांचे माध्यमातून हर घर झंडा या कार्यक्रमाचा प्रचार, प्रसार व जागरुकता निमार्ण करण्यासाठी माहिती पुस्तिका, प्रसिध्दी पत्रके इ. वितरित करणे.
- अंतरसंपर्क (इंटरकॉम) आणि ध्वनीचित्रमुद्रण (व्हिडिओ) प्रणालीद्वारे राज्यांतर्गत प्रवासी बसेसमध्ये - सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित ध्वजगीत वाजविणे, ध्वज संबंधित चित्रफित दाखविणे.

(ए) कृती आराखडा : प्रसार माध्यमे संकेतस्थळ, भिंतीचित्रे इ.

- सर्व राज्य सरकारच्या संकेतस्थळांवर अमृत महोत्सव संकेतस्थळ (amritmahotsav.nic.in) हर घर झंड्याचा दुवा जोडावा.
- राज्य आणि जिल्हा स्तरावरील कृती आराखड्याबद्दल प्रसार माध्यमांना विशेष माहिती देणे. याअंतर्गत -
- १ जूनपासून दररोज विशेष बातमीपत्र सुरु करण्यासाठी दुरदर्शनचा, आकाशवाणीचा वापर करावा.
- स्थानिक प्रसिध्दी अधिकाऱ्यांनी सर्व कार्यक्रमांचे योग्य वार्तांकन करावे व त्यावर प्रकाशझोत टाकावा.
- ध्वज निर्मिती, वितरण, देशभक्ती यांच्याशी संबंधित असलेल्या स्वारस्यपूर्ण कथा निर्माण कराव्यात.
- सर्व सार्वजनिक बदलीच्या ठिकाणी भिंतीचित्रे (वॉल पेंटिंग्ज) निर्माण करावीत.

(ऐ) कृती आराखडा : महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत

- सर्व महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत - नागरी भागातील प्रसारासाठी महत्त्वपूर्ण माध्यम
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत यांच्या प्रशासकीय प्रमुखांनी संबंधित वॉर्डच्या अधिकाऱ्यांसमवेत समन्वय करुन संपर्क सत्रे / चर्चासत्रे याचे आयोजन करावे.
- प्रत्येक वॉर्डात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करावी.
- बचत गटांचा सहभाग : स्थानिक शिलाई काम करणाऱ्या गटांद्वारे ध्वजांची शिलाई / निर्मिती करता येईल.
- विक्री / वितरण केंद्र म्हणून महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत कार्यालयांचा उपयोग करून घ्यावा.
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत या आस्थापनांना ध्वजांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करता येईल. सदर खरेदी स्थानिक घरांच्या संख्येवर आधारीत असावी.
- सर्व प्रशासकीय इमारती / संस्थांवर ध्वजारोहण करावे.
- स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे.
- संदेश वहन साहित्य - प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इ. स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत.
- महानगर पालिका / नगरपालिकांच्या रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षांमध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे, आजादी का अमृत महोत्सव इ. बाबतचे चित्रपट दाखवावेत.
- राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने / शिबीरे / चर्चासत्र इ. चे आयोजन करावे.
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत वसाहतीमध्ये राष्ट्रध्वजाची विक्री व वितरण केंद्रे निर्माण करण्याची विशेष मोहीस घ्यावी.

- जाहिरात फलक, बॅनर, फ्लिप बुक्स, सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित इ. चे नमुने

(औ) केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून खालील स्वरुपाचे सहाय्य उपलब्ध केले जाईल.

- आजादी का अमृत महोत्सव (amritmahotsav.nic.in) या संकेतस्थळावर हर घर झंडा कॉर्नर
- अनुवाद करण्यासाठी व प्रसार व प्रचार करण्यासाठी पुरविलेली माहिती व संप्रेक्षण साहित्य डाऊनलोड करावयात.
- जाहिरात फलक, बॅनर, फ्लिप बुक्स, सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित इ. चे नमुने
- ध्वजगीत व ध्वनिचित्रफित पुरविणे.

*******